डिसेंबर २००४

# तीन महिने बाकी

३१ मार्च २००५ ही सहकारी संस्थांची आर्थिक वर्ष संपण्याची शेवटची तारीख. केवळ तीन महिने बाकी आहेत. या तीन महिन्यांच्या कालावधीत पतसंस्थांनी विविध बाबींकडे बारकाईने लक्ष ठेवून काम करण्याची आवश्यकता आहे. आपापली पतसंस्था निकषांमध्ये बसविण्यासाठी कसरत करावी लागणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील सहकार चळवळीला नकारात्मक दिशेने नेणाऱ्या राज्यातील सहकार आयुक्त, पुणे यांचे कार्यालयाने बेधडक व विध्वंसक फतवे काढण्याचे काम सातत्याने चालूच ठेवलेले आहे. ३१ मार्च २००५ नंतर पतसंस्थांना आणखी अडचणींना सामोरे जावे लागणार असून खुल्या अर्थव्यवस्थेचे आव्हान पेलावे लागणार आहे. नेहमीप्रमाणे पुन्हा आयुक्तांनी राज्यातील पतसंस्थांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या तालुका, जिल्हा, विभाग स्तरावर काम करणाऱ्या सर्व फेडरेशन्सना विश्वासात न घेता, चर्चा न करता दिनांक १०/११/२००४ रोजी पतसंस्थांना एन.पी.ए. नॉर्मस् लागू करण्यात येत असल्याचे जाहिर केलेले आहे. दिनांक ३१ मार्च २००५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून एन.पी.ए. नॉर्मस्च्या तरतुदी पतसंस्थांना लागू करण्यात येत आहेत, असे परिपत्रक प्रसिध्द केले आहे. राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, सहाय्यक निबंधक या सर्वांवर एन. पी. ए. नॉर्मस् चे पालन पतसंस्थांकडून करून घेण्यासाठी जबाबदारी सोपविली आहे. परंतु या सर्वांनी मुंबईसह राज्यातील कुठल्याही पतसंस्थांना या एन.पी.ए. परिपत्रकाची काहीही माहिती न देता, न कळविता एक प्रकारे ३१/०३/२००५ नंतर कारवाईचा बडगा कसा उगारला जाईल, यासाठी व्युहरचना आखल्याचे जाणवते. **जेणे करून पतसंस्थांनी एन.पी.ए. तरतुद न केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी नोटीसा बजावता येतील. व परिपत्रकाचा दुरूपयोग होईल.**

या अगोदर सुधारीत उपविधी, डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन, सी.डी.रेशो, लिक्विडीटी, लेखापरिक्षण, शाखा विस्तार, गुंतवणूक, एस.आर.ओ. इत्यादी संदर्भात परिपत्रके अधिकाऱ्यांनी लागू करून इंग्रजांना मागे टाकतील अशी हुकूमशाही प्रवृत्तीचे विचार सर्वांवर लादलेले आहेत. या प्रकरणी जर सुक्ष्म निरिक्षण–परिक्षण करण्यासाठी आपण जागृक झालो नाही तर, पतसंस्थांची ही चळवळ सर्व सामान्यांसाठी शिल्लक राहणार नाही, तर ती केवळ धनिकांनी चालवावी, चालू करावी व इतरांनी त्याचे बटीक व्हावे असा अत्यंत दुष्ट हेतू संबंधितांचा आहे हेच उघड होईल. नवीन पतसंस्थांची नोंदणी, शाखा विस्तार याबाबत तर, ह्याच अधिकाऱ्यांनी सरकारला सुध्दा आव्हान देऊन राजरोसपणे उच्छाद मांडला आहे.

सहकार खात्यामध्ये काम करणारे अधिकारी सुध्दा सर्व स्तरावर आवाक झाले असुन निमूटपणे कोणाची तरी मर्जी सांभाळण्याच्या षडयंत्रात सामिल झाले आहेत. **कुठल्याही उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय**

**सहनिबंधक, आयुक्त यांना स्वतः ला या एन.पी.ए. विषयाचे मुळ ज्ञान या क्षणापर्यंत अवगत झालेले नाही.** व ज्यांना जे माहित नाही, ते आदेश काढू लागलेले आहेत. व राजकीय नेत्यांची नावे घेऊन अत्यंत वाईट चित्र उभे करण्याचे काम सातत्याने चालू आहे. **ही बाब सहकाराला १०० वर्षे पुर्ण झाली असताना देखील महाराष्ट्र राज्यात बळ धरू लागलेली आहे, हे सांगावयास शरम वाटते.**

कोणाला तरी डोळ्यासमोर ठेवून सर्व सोपस्कर झाल्यानंतर अविचाराने सहकार कायद्याचा तरतुदीतील अधिकाराचा गैरअर्थ काढून संबंधित अधिकाऱ्यांनी सहकार चळवळ मोडीत निघाली तरी चालेल, परंतु आम्ही काहीही करणार, हेच पुन्हा-पुन्हा कृतीने दाखविण्याचे काम बिनधोक चालू ठेवले आहे. एन. पी.ए. याचा अर्थसुध्दा माहित नसणारे परिपत्रकांची अंमलबजावणी कशी करणार, याचा साधा विचार सुध्दा केलेला नाही. केवळ आदेश काढून हळूहळू सर्व छोट्या-छोट्या संस्था बंद कशा करता येतील व मोठ्या संस्थांचे कसे शोषण करता येईल व ही संपुर्ण पतसंस्थांची चळवळ धनिकांच्या ताब्यात कशी दिली जाईल, याचाच रोज पाढा वाचला जात आहे. राज्यातील सर्व पतसंस्थांना या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, **एक छुपी शक्ती आपले शोषण करण्यासाठी निर्ढावली आहे. म्हणून सद्य परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी राहिलेल्या तीन महिन्यांमध्ये डोळ्यात तेल घालून आपापल्या पतसंस्थांचे त्या-त्या ठिकाणी व्यवस्थापन, निधी नियोजन इत्यादी बाबींमध्ये बारकाईने लक्ष घालावे.** त्याशिवाय ही प्रवृत्ती थांबणार नाही. आपल्याला कोणतरी फरफरटत नेत आहेत, कोणाची तरी भिती दाखवत आहे. लाचार, लबाड, कर्तृत्वहीन व दलाल यांच्या माध्यमातून मोठ्यांच्या नावांचा स्वार्थासाठी दुरूपयोग करून व त्यातील काही कर्मदरिद्री लोक यात सामिल झाल्यामुळे सावध राहणे आवश्यक आहे. **येते ३ महिने आपल्याला आव्हाने पेलायची आहेत. उपविधी, सहकार कायदा, संस्थेची आर्थिक स्थिती व सर्व जुलमी परिपत्रके यांचा एकत्रीत मेळ घालून मार्गस्थ होणे गरजेचे आहे. यासाठी सावधतेने पाऊले उचलावीत, ही विनंती.**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**